# मिरा भाईंदर महानगरपालिका

**इतिवृत्त**

जा.क्र.मनपा/पर्यावरण/११४/२०२२-२३
दि. १० / ०१ /२०२३

**विषय : १५ व्या वित्त आयोगातंर्गत प्राप्त अनुदानातुन "स्वच्छ हवा कृती आराखडा" राबविण्याबाबत गठीत केलेल्या समितीची दि. ०५/०१/२०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली बैठक.**

**संदर्भ : १. शासन निर्णय क्र. एफएफसी-२०२२/प्र.क्र.५६/नवि-४,मंत्रालय, मुंबई, दि. २८/१०/२०२०.**
**२. शासन निर्णय क्र.एफएफसी-२०२२/प्र.क्र.१३९/नवि-४,मंत्रालय,मुंबई,दि. २९/१२/२०२२.**

१५ व्या वित्त आयोगातंर्गत प्राप्त अनुदानातुन स्वच्छ हवा कृती आराखडा राबविण्याबाबत गठीत केलेल्या समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी वर्ग उपस्थित होता.

| अ.क्र. | अधिका-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. दिलीप ढोले | आयुक्त |
| २. | श्री. अनिकेत मानोरकर | अति. आयुक्त |
| ३. | श्री. संजय शिंदे | उप-आयुक्त(पर्यावरण) |
| ४. | श्री. रवि पवार | उप-आयुक्त (घनकचरा) |
| ५. | श्री. दिपक खांबित | प्र. शहर अभियंता |
| ६. | श्री. सुरेश वाकोडे | अति. शहर अभियंता |
| ७. | श्री. शरद नानेगांवकर | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| ८. | श्रीम. कविता बोरकर | सहाय्यक आयुक्त (पर्यावरण) |

सदर बैठकीत १५ व्या वित्त आयोगातंर्गत संदर्भिय शासन निर्णयानुसार २०२२-२३ मध्ये प्राप्त ९.१५ कोटी निधी खर्च करुन हवेची गुणवत्ता सुधारणेकरीता महानगरपालिकेच्या संबंधित अधिकारी वर्गाकडुन सविस्तर आढावा घेऊन परिशिष्ठ "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे निधी खर्च करणेची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

| अ. क्र. | मुद्दा | अंदाजपत्रकीय रक्कम (रु. कोटी) | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १. | हवा शुध्द करणारे यंत्र (Air Purifier) | २.०० | पर्यावरण |
| २. | थुंकण्याचे डब्बे (Spit Bins) | ०.३५ | पर्यावरण |
| ३. | IEC Vehicle | ०.८० | पर्यावरण |
| ४. | ग्रीन स्पेस व डिवायडर तयार करणे | २.०० | उद्यान |
| ५. | भाईंदर (प.) स्मशानभूमी येथे Air Exhaust System बसविणे | १.५० | बांधकाम |
| ६. | ई-वाहन चार्जिंग स्टेशन | २.५० | विद्युत |
| | **एकूण** | **९.१५ कोटी** | |

महत्वाचे :-

१. उपरोक्तप्रमाणे बैठकीस दिलेल्या निर्देशानुसार ज्या विभागामार्फत संबंधित कामे करावयाची आहेत. त्या विभागांनी संबंधित कामाबाबतचे तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्याची उचित कार्यवाही दि. ०६ / ०२/२०२३ पर्यंत पूर्ण करावी.

२. उपरोक्तप्रमाणे तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेतल्यानंतर तात्काळ संबंधित कामांची निविदा प्रपत्रे तयार करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात यावी.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका